14 APRIL 26 LT & NOTE

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**विद्यार्थी विकास मंडळ**

**(भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव - २०२६)**

## परिपत्रक

सर्व संलग्नित महाविद्यालय, शैक्षणिक विभागप्रमुख व संचालक, उपकेंद्र धाराशिव यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त बुधवार **दि. ८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. महात्मा फुले सभागृह** येथे कथाकथन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

**- पारितोषिकांचे स्वरुप -**

**प्रथम पारितोषिक रोख रु. ३,०००/- स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र**
**व्दितीय पारितोषिक रोख रु.२,०००/- स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र**
**तृतीय पारितोषिक रोख रु. १,०००/- स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र**

सदरील परिपत्रक आपल्या विभाग व महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच एका विभागातुन / महाविद्यालयामधुन दोनच स्पर्धकांना पाठविण्यात यावे.

या स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता स्पर्धकांची नावे दि. ६ एप्रिल २०२६ पर्यंत संचालक, विद्यार्थी विकास विभाग यांना dsw@bamu.ac.in या मेलव्दारे कळविण्यात यावे.

**सोबत:** स्पर्धा नियमावली

विद्यापीठ प्रांगण ♦
छत्रपती संभाजीनगर ♦
संदर्भ क्र : संविवि/डॉ.बा.अं.ज.उ/२०२६/42142-42673
दिनांक : ३० मार्च २०२६ ♦

**संचालक**
**विद्यार्थी विकास मंडळ**

**याची एक प्रत माहितीस्तव :**

१) मा. कुलगुरु कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
२) मा. प्र-कुलगुरु कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
३) मा. कुलसचिव कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
४) मा. संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव**

**दि. ७ ते १४ एप्रिल २०२६**



## कथाकथन स्पर्धेची नियमावली

१. कथाकथन स्पर्धा केवळ पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी आहे.

२. कथा स्वलिखित असावी. लेखकांची कथा असल्यास स्पर्धकास बाद करण्यात येईल.

३. कथा सादरीकरणासाठी कमीत कमी ६ व जास्तीत जास्त १० मिनिटांचा कालावधी असेल.

४. सादर केलेल्या कथेची एक हस्तलिखित / मुद्रीत प्रत स्पर्धेच्या वेळी सादर करणे बंधनकारक आहे.

५. कथेला विषयाचे बंधन नाही. परंतु कथेद्वारे वैयक्तिक, धार्मिक, निंदा, नालस्ती, समाज, लोकसमूह, श्रध्दा व उपासना यांच्यावर टीका करणे. तसेच कुणाच्याही भावना दुखावणारी नसावी.

६. कथा केवळ मराठी व हिंदी भाषेतून सादर करता येईल.

७. सर्व सहभागी स्पर्धकांना सादरीकरणानंतर सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

८. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

९. स्पर्धेविषयीचा अंतिम निर्णय विद्यापीठ प्रशासनाचा असेल.

१०. स्पर्धकांनी प्राचार्य / विभाग प्रमुख / संचालकांचे पत्र आणि महाविद्यालय / विभागाचे ओळखपत्र सोबत आणावे.

११. स्पर्धेचे पारितोषिक वितरण सोमवार दि. १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मान्यवरांच्या हस्ते करण्यात येईल.

१२. स्पर्धेकरिता व पारितोषिक स्वीकारण्याकरिता येण्या-जाण्याचा प्रवास व अन्य खर्च महाविद्यालय / विभागांनी करावा.